






# बीड नगर पालिकेसमोरच भल्या पहाटे घेतला स्वच्छतेच्या कामाचा आढावा

**बीड,(प्रतिनिधी):– बीड शहरातील स्वच्छतेच्या कामाच्या अनुषंगाने आ.विजयसिंह पंडित, नगराध्यक्ष श्रीमती प्रेमलताताई पारवे यांच्या सूचनेनुसार नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, नगरसेवक शेख निजाम यांच्यासह इतर नगरसेवकांनी आज भल्या पहाटे नगर पालिकेच्या दारातच स्वच्छतेच्या कामाचा आढावा घेतला. कर्मचाऱ्यांची हजेरी तपासली , स्वच्छतेच्या कामात असलेल्या त्रुटी स्वच्छता निरीक्षकांसह मुकादम आणि कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. स्वच्छतेच्या कामात कसल्याही प्रकारची कुचराई खपवून घेतली जाणार नाही अशा सक्त सूचना यावेळी देण्यात आल्या.**

## कर्मचाऱ्यांची हजेरी तपासली, स्वच्छतेच्या सूचना दिल्या

बीडच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे यांच्या सूचनेनुसार नगरपालिकेतील सर्व यंत्रणा सर्वसामान्यांच्या कामासाठी सक्रिय झाली आहे. आज भल्या पहाटे नगरपालिकेच्या दारात स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांची हजेरी घेऊन तपासण्यात आली. स्वच्छता निरीक्षक भागवत जाधव व भारत चांदणे यांच्या उपस्थितीत सर्व मुकादम तसेच सर्व कर्मचाऱ्यांकडून कामाचा आढावा घेण्यात आला. स्वच्छतेची कामे कशा पद्धतीने सुरू आहे, उपलब्ध यंत्रणेच्या माध्यमातून कोण कोणती कामे सुरू आहेत याची माहिती यावेळी घेण्यात आली. काही प्रमाणात कर्मचारी वर्ग अनुपस्थित होते. त्यांचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. स्वच्छतेच्या कामातील ज्या काही त्रुटी आहेत त्या दुरुस्तीच्या सुचना करण्यात आल्या. बीड शहर स्वच्छतेसाठी पालकमंत्री ना. अजितदादा पवार व आ.विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरातील नागरिकांना आवश्यकत त्या सर्व मूलभूत सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. नागरिकांची तक्रार येणार नाही अशा पद्धतीने काम करण्यात येणार आहे.

# मिल्लिया महाविद्यालयात व्याख्यानमालेचे आयोजन

## महात्मा गांधीजींनी सांगितलेल्या सत्याच्या मार्गाचा अवलंब करावा–डॉ.रमेश लांडगे

बीड । दिव्य न्युज ।

येथील मिल्लिया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयाच्या सामाजिकशास्त्र विभाग व विद्यार्थी कल्याण विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या महात्मा गांधी व्याख्यानमालाचे उद्घाटन बुधवार दिनांक ०७ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्री. कालिकादेवी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिरूर कासार येथील इंग्रजी विभागप्रमुख डॉ. रमेश लांडगे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर हुसैनी एस.एस.,राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कय्युम फारुखी, डॉ.शेख गफूर, समाजशास्त्र विभाग प्रमुख तथा व्याख्यानमालेच्या संयोजिका डॉ. सय्यद तनवीर यांची उपस्थिती होती.



प्रमुख अतिथी डॉ.रमेश लांडगे यांनी महात्मा गांधीजी आणि सामाजिक न्याय: विचारमंथन या विषयावर आपले मत व्यक्त केले. डॉ. रमेश लांडगे यांनी महात्मा गांधीजींचे जीवन चरित्र व त्यांच्या योगदानाचे महत्त्व समजावून सांगितले तसेच त्यांच्या चळवळीची सुरुवात आफ्रिकेतून कशी झाली यावर प्रकाश टाकला. महात्मा गांधी यांचा भारतीय सामाजिक चळवळीमध्ये व राष्ट्र निर्माणमध्ये असलेले योगदान स्पष्ट केले. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात गांधीजींचे योगदान व त्यांच्या जीवन कार्यावर सखोल माहिती दिली. गांधीजींचा सत्याग्रह सिद्धांत, अहिंसा, सविनय कायदेभंग आंदोलन, असहकार चळवळ व भारत छोडो आंदोलन यात गांधीजींची भूमिका याचे महत्व प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी महात्मा गांधीजींनी सांगितलेल्या सत्याच्या मार्गाचा अवलंब करावा. सामाजिक सलोखा व सामाजिक न्याय समाजाला शिकवण्याचे त्यांनी कार्य केले असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर हुसैनी एस.एस. यांनी गांधीजींच्या विचाराचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. आजच्या युगात गांधीजींचे विचार अवलंबने किती महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी प्रकाश टाकला. महात्मा गांधींचे विचार सर्वांना जोडणारे आहेत. त्यांनी अहिंसेच्या मार्गाने भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. आज सर्वांनी आपल्या जीवनात गांधीजींच्या विचारांना स्थान दिले पाहिजे, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा सूत्रसंचालन डॉ.अब्दुल अनिस यांनी तर आभार डॉ.शेख गफूर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास विद्यार्थी– विद्यार्थिनी, प्राध्यापकवृंद यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहम्मद इलयास फाजील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाळणाऱ्यांवर देशद्रोहाची कारवाई करा

## पुरोगामी महाराष्ट्रासाठी संघटनांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

जिंतूर । दिव्य न्युज प्रतिनिधी

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाळण्याची घृणास्पद व देशद्रोही घटना घडल्याच्या निषेधार्थ पुरोगामी महाराष्ट्रासाठी या सामाजिक व पुरोगामी विचारसरणीच्या संघटनांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व गृहमंत्री यांच्याकडे तीव्र निषेध नोंदवत कठोर कारवाईची मागणी केली आहे. यासंदर्भात तहसीलदार जिंतूर यांच्यामार्फत राज्य सरकारला निवेदन सादर करण्यात आले आहे. मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर येथे अनिल मिश्रा व त्याच्या टोळीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाळल्याची घटना समोर आली असून, ही कृती अत्यंत घृणास्पद, समाजद्रोही व देशद्रोही असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ही घटना केवळ एका महापुरुषाचा अपमान नसून भारतीय संविधान, सामाजिक समता, बंधुता व लोकशाही मूल्यांवर केलेला थेट हल्ला असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, यापूर्वीही संबंधित व्यक्तींनी महापुरुषांच्या पुतळ्यांचा विरोध करणे, समाजात तेढ निर्माण करणे व सतत चिथावणीखोर कृती करणे असे प्रकार केले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाळण्याची घटना देशातील शांतता व सामाजिक सलोखा बिघडवणारी असून, अशा कृत्यांमुळे गंभीर परिणाम होऊ शकतात.



सदर फोटो जाणूनबुजून सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आल्याने महामानवांच्या अनुयायांची भावना दुखावली असून, ऐ.आय. व डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भविष्यात अशा प्रतिमांचा विकृत व धोकादायक वापर होण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

मुख्य मागण्या : सदर कृत्य करणाऱ्या अनिल मिश्रा व त्याच्या टोळीला देशद्रोही घोषित करण्यात यावे. संबंधित आरोपींवर युएपीऐ (UAPA) सारख्या कठोर कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून तात्काळ अटक व खटला चालवावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच इतर महापुरुषांच्या प्रतिमा जाळणे, विटंबना करणे किंवा अवमान करणाऱ्यांसाठी बि एन एस अंतर्गत स्वतंत्र व कठोर कायद्याची तरतूद करण्यात यावी. अशा समाजद्रोही प्रवृत्तींविरोधात राज्य व केंद्र सरकारने स्पष्ट व कठोर भूमिका जाहीर करावी. देशातील शांतता व सामाजिक एकोपा बिघडवणाऱ्या कृत्यांवर 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोट्यवधी भारतीयांचे प्रेरणास्थान असून त्यांच्या विचारांवरच आजचा भारत उभा आहे. त्यांच्या प्रतिमेची विटंबना कदापि सहन केली जाणार नाही, अशी भूमिका संघटनांनी घेतली आहे. शासनाने तात्काळ कठोर कारवाई न केल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

# क्रिडा शिक्षक एस.एम.तांदळे सरांचा वाढदिवस उत्साहात साजरा



दौलावडगाव । दिव्य न्युज ।

नुतन सरस्वती शिक्षण संस्था, देवळाली पानाची संचलित सरस्वती विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय दौलावढगाव ता. आष्टी येथील क्रिडा शिक्षक तसेच संस्थेचे प्रयवेक्षक श्री.एस.एम.तांदळे सर यांचा वाढदिवस विद्यालय परिसरात साधेपणाने व उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सरस्वती विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद तसेच पत्रकार कासम शेख यांनी तांदळे सरांना मनःपूर्वक वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, विशेषतः क्रीडा क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय असून शिस्त, मेहनत व प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थी घडली. तांदळे सरांच्या उज्ज्वल शैक्षणिक व क्रीडाक्षेत्रातील वाटचालीस शुभेच्छा देत त्यांच्या दीर्घायुष्याची कामना करण्यात आली. कार्यक्रम प्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी,शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

# बीडच्या मातीतील वास्तव आणि लेखणीची कसोटी; दर्पण दिवस–किरण डावकर

बीड । दिव्य न्युज ।

६ जानेवारी दर्पण दिन हा दिवस केवळ पत्रकारांचा सन्मान करण्यापुरता मर्यादित नसून, पत्रकाराणे स्वतःकडे पाहण्याचा, स्वतःला तपासण्याचा दिवस आहे. ज्या दर्पण या वृत्तपत्राने मराठी पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवली, त्या दर्पणाचा खरा अर्थच आहे आरसा आजचा हा दिवस म्हणजे आपल्या लेखणीचा आरसा पाहण्याचा दिवस आहे. बाळशास्त्री जांभेकरांनी १८३२ साली सुरू केलेले दर्पण हे केवळ पहिले मराठी वृत्तपत्र नव्हते, तर ते होते समाजप्रबोधनाचे साधन सत्य, निर्भयता आणि सामाजिक जबाबदारी हीच त्या काळातील पत्रकारितेची ओळख होती. आज जवळपास दोन शतकांनंतर प्रश्न असा उभा राहतो की आजची पत्रकारिता त्या मूल्यांशी कितपत प्रामाणिक आहे.

पत्रकारिता : व्यवसाय की लोकशाहीचा कणा पत्रकारिता ही नोकरी नाही, तर लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, असे आपण नेहमी म्हणतो. पण प्रत्यक्षात हा स्तंभ किती भक्कम आहे, याचा विचार करणे गरजेचे आहे. पूर्वी पत्रकार म्हणजे समाजाचा आवाज होता. अन्यायाविरोधात उभा राहणारा सत्तेला प्रश्न विचारणारा आणि सामान्यांच्या वेदना मांडणारा घटक म्हणजे पत्रकार

आज मात्र पत्रकारितेचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. टीआरपी, व्ह्यूज, जाहिराती, राजकीय जवळीक, आर्थिक दबाव या सगळ्यांमध्ये सत्य हरवत चालले आहे पत्रकारितेचा हेतू माहिती देणे न राहता प्रभाव टाकणे बनत चालला आहे. बिड जिल्हा हा सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील जिल्हा म्हणून ओळखला जातो इथे शेतकरी आत्महत्या, पाण्याची टंचाई, बेरोजगारी गुन्हेगारी, महिलांवरील अत्याचार, राजकीय संघर्ष अशा असंख्य घटना घडतात. प्रश्न असा आहे की या सगळ्या वास्तवावर पत्रकार निर्भयपणे लिहू शकतो का? आज बिडमधील अनेक पत्रकार दबावाखाली काम करत आहेत. राजकीय हस्तक्षेप आर्थिक असुरक्षितता धमक्या खोटे गुन्हे दाखल होण्याची भीती जाहिरात बंद करण्याचे इशारे या सगळ्या परिस्थितीत सत्य मांडणे म्हणजे स्वतःला संकटात टाकणे ठरते. परिणामी अनेकदा बातम्या सौम्य केल्या जातात, काही बातम्या दाबल्या जातात, तर काही बातम्यांना दिशाभूल करणारे वळण दिले जाते मोबाईल पत्रकारिता, सोशल मीडिया, युट्यूब, फेसबुक यामुळे बातमी क्षणार्धात लोकांपर्यंत पोहोचते. हे माध्यम क्रांतीचे लक्षण असले, तरी त्याचबरोबर काही गंभीर प्रश्नही निर्माण झाले आहेत आज अनेकदा अपूर्ण माहितीवर



आधारित बातम्या पडताळणी न करता व्हायरल होणारे व्हिडिओ अफवा आणि दिशाभूल सनसनाटी मथळे यामुळे पत्रकारितेवरील विश्वास कमी होत चालला आहे. वेगाच्या स्पर्धेत सत्य मागे पडत आहे. बाळशास्त्री जांभेकरांच्या काळात पत्रकारितेने अनेक संकटांचा सामना केला. तेव्हा ना आधुनिक साधने होती, ना संरक्षण होते तरीही त्यांनी सत्य मांडले, समाजाला जागे केले दर्पणची मूल्ये आजही तितकीच महत्त्वाची आहेत. सत्यनिष्ठा निर्भयता सामाजिक बांधिलकी सामान्य माणसाच्या बाजूने उभे राहणे आज गरज आहे ती या मूल्यांना पुन्हा केंद्रस्थानी आणण्याची.

आजचा पत्रकार : संघर्षमय वाटचाल आजचा पत्रकार हा अनेक आघाड्यांवर लढत आहे एकीकडे समाजाच्या अपेक्षा दुसरीकडे व्यवस्थेचा दबाव सत्य लिहिलं तर धोका, न लिहिलं तर आत्मग्लानी तरीही आजही काही पत्रकार आहेत, जे धमक्यांना न घाबरता आर्थिक नुकसान सहन करून सत्तेला प्रश्न विचारतात हेच पत्रकार दर्पणच्या विचारांचे खरे वारसदार आहेत.

दर्पण हा केवळ इतिहास नाही, तो एक विचार आहे. आजच्या पत्रकारितेला त्या विचारांचा आधार घेण्याची गरज आहे कारण लेखणी वाकली तर लोकशाही कमकुवत होते. लेखणी सरळ राहिली तर समाज जागा होतो. दर्पण दिन म्हणजे अभिनंदनाचा नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे.आजच्या पत्रकाराने स्वतःला एकच प्रश्न विचारायला हवा माझी लेखणी सत्याचा आरसा आहे का असे मत सामाजिक कार्यकर्ता किरण डावकर यांनी आपल्या लेखणीतून व्यक्त केल आहे. मो.९०९७१३९९९९

# पाटोद्यात पत्रकार दिन उत्साहात साजरा; अंगद सांगळे यांच्या वतीने पत्रकार बांधवांचा लेखणी देऊन सन्मान

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यात पत्रकार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे पाटोदा तालुकाध्यक्ष अजय जोशी हे होते. या कार्यक्रमात आमदार सुरेश धस यांचे मावळे अंगद सांगळे यांच्या वतीने पत्रकार बांधवांचा लेखणी देऊन सन्मान करण्यात आला. लेखणी ही पत्रकाराच्या सत्य, निर्भीड व निःपक्ष पत्रकारितेचे प्रतीक असल्याने या सन्मानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. यावेळी युवा पत्रकार जितेंद्र भोसले यांनी पत्रकारितेच्या मूल्यांवर आपले विचार मांडले. समाजातील अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे उभे राहणारी, सत्यनिष्ठ आणि जबाबदार पत्रकारिता हीच लोकशाहीचा खरा कणा असल्याचे त्यांनी नमूद केले.अध्यक्षीय भाषणात अजय जोशी यांनी पत्रकार दिनाच्या शुभेच्छा देत पत्रकारांनी सामाजिक बांधिलकी जपत लोकहितासाठी काम करत राहावे, असे आवाहन केले. कार्यक्रमामुळे पत्रकारांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून पत्रकारितेची मूल्ये जपण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला कार्यक्रमाचे आभार पत्रकार जावेद शेख यांनी मानले



# अनेक शिष्य घडविणाऱ्या गुरूंचा सन्मान



## शास्त्रीय गायक श्री.विशालजी महारगुडे यांना गानगंधर्व पुरस्कार प्रदान

बीड । दिव्य न्युज ।

डॉ.पं. कैवल्य कुमार गुरव (किराणाघराणा) यांचे शिष्य तथा आतापर्यंत अनेक शिष्य घडविणारे गुरू शास्त्रीय गायक श्री. विशालजी महारगुडे यांना गुरुवारी महंत हभप दत्ता महाराज गिरी गोरक्षनाथ संस्थान कुंभे जळगाव यांच्या शुभहस्ते गानगंधर्व पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्री.विशालजी महारगुडे गेल्या २५ वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून संगीत सेवेत असून त्यांनी अनेक राज्यात आतापर्यंत विविध कार्यक्रम केले आहेत. शिवाय कर्नाटक राज्यातील कृष्ण मंदिर, ध्यान संगीत अकॅडमी, कलाश्री संस्कृत वेदिके संस्था, हदगाव कुमठा तसेच छत्रपती संभाजीनगर येथेही त्यांनी अनेक कार्यक्रम केले आहेत.

पुणे येथील बालगंधर्व तसेच आळंदी मध्ये माऊलींच्या गाभाऱ्यातही त्यांच्या कार्यक्रमाचे सादरीकरण झाले आहे. तसेच बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड आकाशवाणी, दत्त मंदिर, एनएससी अकॅडमी तसेच प्रसिद्ध गायक पंडित गोविंदराज जळगावकर विस्मृती समारोह च्या निमित्ताने त्यांचे गायन झाले आहे. अशाप्रकारे त्याची संगीत साधना अखंडित सुरू असून त्यांनी आतापर्यंत अनेक शिष्य घडविले आहेत आणि सध्याही घडवित आहेत. त्यांच्या या महान कार्याची दखल घेऊन अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांना गानगंधर्व पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# एकाच दिवसात ३० लाख वृक्षलागवडीचा इंडियन बुक ऑफ रेकॉर्डचा ढोल; प्रत्यक्षात वृक्षांची उपेक्षा!





बीड । दिव्य वार्ता ।

हवामान बदल, प्रदूषण आणि जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात एकाच दिवशी तब्बल ३० लाखांहून अधिक रोपांची लागवड केल्याचा गाजावाजा करण्यात आला. या उपक्रमाची इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद झाल्याचा अभिमान व्यक्त करत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. मात्र, या वृक्षलागवडीचा खरा चेहरा वेगळाच असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे. वृक्षलागवड ही केवळ इव्हेंट म्हणून न करता, तिचे संगोपन व संवर्धन महत्त्वाचे असते. निदान बीड रेल्वे स्थानकाच्या दर्शनी भागातील लागवड केलेल्या झाडांची तरी जबाबदारी जिल्हा प्रशासनाने घ्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## निदान दर्शनी भागातील रेल्वे स्टेशनवरील वाळलेल्या झाडांकडे जिल्हाधिकाऱ्यांनी विवेक जागा ठेवून पाहावे –डॉ.गणेश ढवळे





### उद्घाटनाच्या झगमगाटानंतर झाडांची दुरवस्था

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड शहरातील पालवण येथील नव्या रेल्वे स्थानकाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार, पर्यावरणमंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या उद्घाटनापूर्वी रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या मुख्य सिमेंट रस्त्याच्या कडेला १२ ते १५ फूट उंचीची झाडे लावण्यात आली होती. मात्र उद्घाटनाचा सोहळा संपताच या झाडांचे संगोपन पूर्णतः दुर्लक्षित करण्यात आले. आज त्या ठिकाणी अनेक झाडे पाण्याअभावी वाळून गेली, काही मोडून पडली, तर काही झाडे पूर्णपणे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. याकडे जिल्हा प्रशासनाने जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे.

### पालकमंत्र्यांची दिशाभूल?

जिल्हाधिकाऱ्यांनी वर्षभरात १ कोटी रोपे लावण्याचा संकल्प जाहीर केला असला, तरी प्रत्यक्षात वृक्षसंगोपनाची जबाबदारी झटकली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत पुढील चार वर्षांत १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट असल्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी स्पष्ट केले होते. मात्र हे स्वप्न फक्त कागदोपत्रीच पूर्ण केले जात असल्याचा आरोप आता पुढे येत आहे. इंडियन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंदवून सन्मान स्वीकारण्यापेक्षा, जमिनीवर लावलेल्या झाडांचे प्राण वाचवणे अधिक गरजेचे आहे. वृक्षलागवडीचे इव्हेंट करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांनी आता तरी प्रत्यक्ष जबाबदारी घ्यावी, अशी ठाम मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

## फारुख पटेल यांना बीड न.प.चे उपनगराध्यक्ष करा-नवीद इनामदार

बीड । दिव्य वार्ता ।



बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या यशासाठी अहोरात्र परिश्रम घेणारे गटनेते फारुख पटेल यांना उपनगराध्यक्षपद देण्यात यावे, अशी मागणी नवीद इनामदार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे. इनामदार यांनी सांगितले की, फारुख पटेल यांनी निवडणूक काळात स्वतःच्या वॉर्डाचा किंवा स्वतःचा प्रचार न करता जास्तीत जास्त नगरसेवक आणि नगराध्यक्ष कसे निवडून येतील यासाठी नियोजनबद्ध प्रचार केला. रात्रंदिवस परिश्रम घेऊन त्यांनी पक्षाच्या उमेदवारांसाठी काम केले.फारुख पटेल हे जात-धर्म न पाहता सर्वसामान्यांच्या सेवेत कायम उपलब्ध असणारे नेते म्हणून ओळखले जातात. यापूर्वीही त्यांनी उपनगराध्यक्षपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली असून, त्यांना प्रशासकीय कामकाजाचा मोठा अनुभव आहे, असेही इनामदार यांनी नमूद केले.

अल्पसंख्याक समाजामध्ये फारुख पटेल यांची चांगली प्रतिमा असून, या समाजाने राष्ट्रवादी काँग्रेसवर जो विश्वास दाखवला आहे, त्या विश्वासाला न्याय देण्यासाठी पक्षाने फारुख पटेल यांना उपनगराध्यक्षपदाची संधी द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. निवडणुकीतील यशामागे फारुख पटेल यांचे नियोजन, प्रचार आणि संघटनात्मक कौशल्य महत्त्वाचे ठरले असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना उपनगराध्यक्षपद देण्यात यावे, अशी ठाम भूमिका नवीद इनामदार यांनी प्रसिद्धीपत्रकात मांडली आहे.

## सरवर पिंपळगावमध्ये आपत्तीग्रस्तांवर अन्याय? नुकसानभरपाई व प्रस्तावित प्लॉटिंगवर ग्रामस्थांचा गंभीर आरोप

माजलगाव । दिव्य वार्ता ।

माजलगाव तालुक्यातील सरवर पिंपळगाव येथे अलीकडे झालेल्या अतिवृष्टीमुळे गावातील अनेक कुटुंबांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मुसळधार पावसामुळे अनेक घरांची पडझड झाली असून शेती पाण्याखाली गेली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक कुटुंबांना आपली घरे सोडून २ ते १० किलोमीटर अंतरावर तात्पुरत्या ठिकाणी आश्रय घ्यावा लागला आहे. या आपत्तीला काही काळ लोटूनही अद्याप सर्व नुकसानग्रस्तांना अपेक्षित आणि समान स्वरूपाची मदत मिळालेली नसल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. शासनाकडून देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाईमध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत असून काही निवडक व्यक्तींनाच लाभ दिला जात असल्याचा आरोप होत आहे.

प्रत्मक्षात घर कोसळलेली व संपूर्ण कागदपत्रे असलेली अनेक कुटुंबे मात्र मदतीपासून वंचित राहिल्माचे चित्र आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, नुकसानग्रस्तांची यादी तयार करताना पारदर्शकता पाळली गेली नाही. काही ठिकाणी प्रत्यक्षात नुकसान नसतानाही काही नावे यादीत समाविष्ट करण्यात आली असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दुसरीकडे झढठ, घरपट्टी, वीजबिल यांसारखी कागदपत्रे असूनही अनेक गरजू कुटुंबांना मदत मिळालेली नाही. यामुळे गावात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, प्रशासनाकडून सरवर पिंपळगावच्या पुनर्वसन आणि विकासासाठी नवीन प्लॉटिंगसाठी जमीन उपलब्ध करून देण्याची चर्चा सुरू आहे. मात्र, या प्लॉटिंगचा लाभ नेमका कोणाला मिळणार, याबाबत ग्रामस्थांमध्ये संभ्रम आहे. नुकसानभरपाईप्रमाणेच प्लॉटिंगच्या लाभातही अन्याय होणार की काय, अशी भीती व्यक्त केली जात आहे. ग्रामस्थांचा थेट सवाल आहे की, जर गावाबाहेर तात्पुरते राहणारे नागरिक खरे गावकरी नसतील, तर त्यांची नावे नुकसानग्रस्तांच्या यादीत कशी आली? आणि जर ते गावाचेच नागरिक असतील, तर मग नुकसानभरपाई व प्लॉटिंगचा लाभ सर्व पात्र नागरिकांना समान पद्धतीने का दिला जात नाही?

या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी प्रशासनाकडे स्पष्ट मागणी केली आहे की, नुकसानग्रस्तांची यादी नव्याने तपासून पूर्णपणे पारदर्शक चौकशी करण्यात यावी. सर्व पात्र आपत्तीग्रस्तांना कोणताही भेदभाव न करता नुकसानभरपाई देण्यात यावी तसेच पुनर्वसनासाठी देण्यात येणारी जमीन व प्लॉटिंगचा लाभ सर्वांना

▶▶ पान २ वर

## परभणी पोलिस दलातर्फे हेल्मेट मोटारसायकल रॅलीचे आयोजन



परभणी । दिव्य न्युज ।

राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान – २०२६ व पोलिस रेजिंग डे निमित्त परभणी पोलिस दलाच्या शहर वाहतूक शाखेच्यावतीने परभणी शहरात हेल्मेट मोटारसायकल रॅली बुधवारी (दि.७जानेवारी) संपन्न झाली. ही रॅली आज सकाळी साडेनऊ वाजता राजगोपालचारी उद्यान येथून सुरू होऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत पोलिस अधिक्षक कार्यालय परिसरात विसर्जित झाली. रॅलीत जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्यासह पोलिस अधिकारी, अंमलदार तसेच नागरिकांनी हेल्मेट परिधान करून सहभाग नोंदवला. या उपक्रमातून रस्ता सुरक्षा व हेल्मेट वापराचे महत्त्व नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६६ वा दीक्षान्त सोहळा थाटात

मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली नेत्रदीपक सोहळा



छत्रपती संभाजीनगर । दिव्य न्युज।

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६६ वा दीक्षांत समारंभ सोमवारी (दि.पाच) थाटात संपन्न झाला. अत्यंत शिस्तीत अवघ्या ७० मिनिटांत हा संपूर्ण कार्यक्रम पार पडला. या समारंभास पुणे येथील 'आयसर' या राष्ट्रीय संस्थेचे संचालक डॉ.सुनील भागवत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ नाट्यगृहात सकाळी ११:३० ते १२:४० या वेळेत सदर कार्यक्रम सुरु झाला. यावेळी प्रकुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर, परीक्षा मंडळ संचालक डॉ.बी.एन.डोळे, वित्त व लेखाधिकारी सविता जम्पावाड.

▶▶ पान २ वर



सिल्लोड शहरातील आझाद नगर येथील नवनिर्वाचित नगरसेवक आसिफ बागवान यांच्या संपर्क कार्यालयत मंगळवारी पत्रकार दिनानिमित्त शेख अफसर यांचा सत्कार करताना अल्तमश आसिफ बागवान दिस्त आहे.

छायाचित्र: शेख अफसर सिल्लोड

## शाळेच्या दारातच मुली असुरक्षितता

### नगरसेवक मोहसीन शेख यांचे पोलिसांना निवेदन


परळी । दिव्य वार्ता ।



परळी शहरातील मिलिया शाळा बरकत नगर परिसरात शाळेत जाणाऱ्या अल्पवयीन मुलींना वारंवार छेडछाड व त्रास दिला जात असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. याबाबत प्रभाग क्रमांक ०३चे नगरसेवक मोहसीन शेख यांनी आज दिनांक ७ जानेवारी रोजी परळी संभाजीनगर पोलीस प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले आहे की दररोज दुपारी सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास मिलिया शाळा सुटल्यानंतर अनोळखी इसमाकडून शाळेजवळील परिसरात थांबून अल्पवयीन मुलींना अश्लील शेरे, नजरकटाक्ष व छेडछाड केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकारामुळे शाळकरी मुली तसेच पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण

▶▶ पान २ वर

## जामखेड तालुक्यातील भटक्या-विमुक्त महिलांसाठी तसेच आशा वर्कर व अंगणवाडी सेविका यांच्यासाठी जेंडर व प्रजनन आरोग्य हक्कांवर प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न



जामखेड । दिव्य न्युज ।

पंचायत समिती, जामखेड व ग्रामीण विकास केंद्र, जामखेड यांच्या संयुक्त विद्यमाने जामखेड तालुक्यातील भटक्या-विमुक्त समुदायातील महिला सामाजिक कार्यकर्त्या, एकल महिला, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, एकल महिला व आरोग्य कार्यकर्त्यांसाठी जेंडर (लिंगभाव समानता) व महिलांचे प्रजनन आरोग्य हक्क या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा मंगळवार, दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी जामखेड येथील महावीर मंगलकार्यालयात यशस्वीरीत्या

▶▶ पान २ वर

## धारुर शहरातील सर्व्हे नं.६२२ मधील बगीचा व ओपन स्पेस अतिक्रमण प्रकरणी कारवाई नाही

- सामाजिक कार्यकर्ते आसिम जरगर यांचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा
- आसिम जरगर यांची शिष्टमंडळसह मुख्याधिकारी यांच्याकडे मागणी

धारूर । दिव्य वार्ता ।

धारूर शहरातील मौजे धारूर येथील सर्वे नं. ६२२ मधील ०२ एकर २० गुंठे क्षेत्रावर मंजूर लेआऊटनुसार राखीव ठेवण्यात आलेल्या बगीचा व ओपन स्पेस रस्ता व स्टॅच्यू जागेवर झालेल्या अतिक्रमणाविरोधात सामाजिक कार्यकर्ते आसिम जरगर यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना गंभीर स्वरूपाचा इशारा दिला आहे.

दि. २१ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे त्यांनी लेखी निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे. सदर सर्व्हे नं. ६२२ साठी दि. १४ ऑक्टोबर १९९३ रोजी मा. नगर रचनाकार, बीड यांनी अकृषि परवाना व लेआऊट प्लॅन मंजूर केला होता. या लेआऊटनुसार रस्त्यालगत पूर्व बाजूस ओपन स्पेस व पश्चिम बाजूस बगीचा व रस्त्यासाठी जागा राखीव ठेवणे बंधनकारक होते. मात्र प्रत्यक्षात ही सार्वजनिक उपयोगाची जागा न ठेवता, ती परस्पर बेकायदेशीररीत्या विक्री करून त्यावर दुकाने व गाळे उभारण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या गंभीर अतिक्रमणाबाबत दि. २४ मई २०२४

▶▶ पान २ वर






हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०